# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २४.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १८,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२३/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन औंढा ना येथे एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांकडुन ६.८४ लिटर दारू असा एकुण ३,०४०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०३ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**चोरी :—**

दिनांक २३/०७/२०२२ रोजी फिर्यादी सोपान सुभाष शिंदे रा केसापुर ता जि. हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी.येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. २०.०७.२२ रोजी चे १२:०० ते १५:०० वा चे सुमारास केसापुर ते लोहगाव रोडवर यातील फिर्यादीची स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्रमांक एमएच ३८ झेड ८३१७ ही शेतालगतचे रोडचे बाजुस लावलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली म्हणुन गुन्हा या संदर्भात नर्सी ना.पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत ठरणाऱ्याविरूध्द गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/०७/२०२२ रोजी फिर्यादी शेख फयाज शेख मन्नान वय ३८ रा बोरी शिकारी ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे बासंबा येथे कलम ३०४अ,२७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२०.०७.२२ रोजी चे १९:५५ वा चे सुमारास कळमनुरी ते हिंगोली रोडवर खानापुर चे पुलावर यातील बस क्रमांक एमएच २० बि एल ३६८५ च्या चालकाने त्याचे ताब्यातील बस हि भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मयत बसलेल्या मोटार सायकल ला पाठीमागुन जोराची धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.